पुढारी

# ‘रवळनाथ हौसिंग’कडून पी. पी. ई. किट खरेदीकरिता आर्थिक मदत

**आजरा : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना साथीचा संसर्ग आणि फैलाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेंतर्गत पी. पी. ई. किट खरेदीकरिता आजऱ्यातील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स संस्थेतर्फे १५ हजारांची मदत देण्यात आली.

तहसीलदार विकास अहिर यांच्याकडे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले व उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी मदतीचा धनादेश सुपूर्द केला. यापूर्वी रवळनाथतर्फे गडहिंग्लज उपजिल्हा रुग्णालय, गडहिंग्लज नगरपरिषद, गडहिंग्लज पोलिस ठाणे, पोलिस उपअधीक्षक कार्यालय, आजरा तहसील कार्यालय, आजरा पोलिस ठाणे, कुडाळ पोलिस ठाणे, ज्येष्ठ नागरिक, सभासद, कर्मचारी व पत्रकार आदींना मिळून सुमारे ८०० मास्कचे वाटप करण्यात आले.

याशिवाय रवळनाथतर्फे कोरोनाच्या मुकाबल्यासाठी पंतप्रधान निधीला ५ लाखांची भरीव मदत करण्यात येणार आहे, असे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी सांगितले. यावेळी शाखा अधिकारी अशोक सुळकुडे उपस्थित होते.